महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093. Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९ ☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)
www.midcindia.org

क्र. मऔविम/भू-विभाग/मव्य (भूमी)/ P२०५९३२ दिनांक : १५.०३.२०२४

# परिपत्रक

**विषय : IT/ITES, Nano Technology,Bio-Tech, Pharma, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादीच्या पुनर्जीवनासाठी योजना लागू करणेबाबत.**

संदर्भ : १) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ ई९४४८३, दिनांक २९.१२.२०२१
२) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ए७६९२८, दिनांक २३.०१.२०२३

महामंडळाने दिनांक १०.१२.२०२०, २४.०५.२०२१, २६.११.२०२१, २९.१२.२०२१ तसेच दिनांक २१.०३.२०२२ च्या परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, न्यायालयीन बाबी, उद्योग अवसानयात जाणे, आर्थिक मंदी इत्यादीमुळे महाराष्ट्रात उद्योग बंद पडलेले आहेत किंवा काही कारणास्तव जे उद्योजक उद्योग सुरु करु शकले नाहीत, अशा २०,००० चौ.मी. व त्यावरील क्षेत्राच्या भूखंडधारकांना त्यांचे भूखंड जे उद्योजक ५०० कोटी व त्यापेक्षा जास्त गुंतवणूक करु इच्छितात त्यांना IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादीच्या पुनर्जीवनासाठी योजना निर्गमित केलेली होती.

महामंडळाने दिनांक २१.०३.२०२२ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर परिपत्रक निर्गमित केल्यापासून उद्योजकांना फक्त १० दिवसांचा कालावधी मिळाला आहे. प्रकरणी, परिपत्रक अवगत होणे, कागदपत्र सादर करणे, त्याची छाननी होणे इत्यादिकरीता लागणारा कालावधी विचारात घेता, सदरहू योजनेचा कालावधी वाढविणे तसेच दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकातील अ. क्र. २ नुसार ५०० कोटी गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना देण्यात आलेला ५ वर्षाचा कालावधी जे भूखंडधारक स्वत: त्यांच्या भूखंडावर IT/ITES, Nano Techonlogy, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center भूखंड स्वत: विकसित करतील व प्रकल्पातील गुंतवणूक ५०० कोटी किंवा जास्त असेल त्यांनाही दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकातील अ. क्र. २ नुसार चटई निर्देशांक वापर करण्याकरीता कालावधी देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर योजना Pharma प्रकल्पांकरिता देखील लागू करणेबाबत उद्योजकांकडून मागणी

midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

होत असल्याने सदरहु विषय महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक २७.१२.२०२२ रोजी झालेल्या ३९४ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ६४८९ अन्वये दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ए७६९२८, दिनांक २३.०१.२०२३ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर योजना दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंत कार्यान्वित होती.

सदर परिपत्रकामधील मुद्दा क्रमांक २ व ३ येथे मुदतवाढ शुल्क व विकास कालावधीसंदर्भात स्पष्टता होणे आवश्यक आहे. तसेच ज्या भूखंडामधील हस्तांतरी कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणाऱ्या कंपनीस भूखंड अनौपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशाकानुसार (FSI) सुधारित हस्तांतरण शुल्क आकारण्याबाबत सदर परिपत्रकामध्ये मुद्दा क्रमांक ४ येथे मार्गदर्शन आहे. यामध्ये मेगा प्रकल्पांचा देखील समावेश करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे सदर योजनेचा कालावधी वाढविणेबाबत मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने दिनांक २९.१२.२०२१ तसेच दिनांक २३.०१.२०२३ रोजीच्या परिपत्रकामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक ०६.०३.२०२४ रोजी झालेल्या ३९९ व्या बैठकीमधील ठराव क्रमांक ६७८६ अन्वये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. सदरहु योजना माहे ३० जुन, २०२४ पर्यंतच कार्यान्वीत राहिल आणि कुठल्याही परिस्थितीत सदर योजनेस मुदतवाढ दिली जाणार नाही.
२. जे भूखंडधारक स्वत: त्यांच्या भूखंडावर IT/ITES, Nano Techonlogy, Bio-Tech, Pharma, Robotics, Industries- ४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प विकसित करणार आहेत, तसेच त्यांची प्रकल्पामधील गुंतवणूक ५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा भूखंडधारकांस सदरहू भूखंडास मुदतवाढ शुल्क लागू असल्यास अशा प्रकरणी मुदतवाढीसाठी देय असणा-या एकूण मुदतवाढ शुल्काच्या एकूण ३० टक्के आकारणी करण्यात यावी.
३. अशा भूखंडधारकास पहिल्या दोन वर्षात २० टक्के चटई निर्देशाकांचा वापर करणे व उर्वरित २० टक्के चटई निर्देशांक विभागानुसार उर्वरित कालावधीमध्ये किंवा ३ वर्षे यापैकी जास्तीचा असेल त्यामध्ये करणे अनिवार्य राहील.
४. वरीलप्रमाणे विकास कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील मुदतवाढ महामंडळाच्या त्या-त्या वेळच्या प्रचलित धोरणानुसार देण्यात यावी.
५. ज्या भूखंडामधील हस्तांतरी कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल अथवा सदर हस्तांतरी कंपनी “मेगा प्रकल्प किंवा अल्ट्रा मेगा प्रकल्प” असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनौपचारीक हस्तांतरण प्रकरणात

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

वापरलेल्या चटई निर्देशकानुसार (FSI) खालीलप्रमाणे सुधारित हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावे.

| अ.क्र. | चटई निर्देशकांचा वापर | आकारावयाचे हस्तांतर शुल्क |
|---|---|---|
| १ | ७.५० टक्के व त्यापेक्षा कमी | १५ टक्के |
| २ | ७.५० टक्के पेक्षा जास्त व १० टक्कयापेक्षा कमी | ७.५० टक्के |
| ३ | १० टक्के व त्यापेक्षा जास्त | ३ टक्के |

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१५.०३.२५

(अनिल भंडारी, भाप्रसे)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम,अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in